आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
५ जुलै २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- त्रिनिदाद आणि टोबॅगोचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अर्जेंटिनात पोहोचले, भारतीय समुदायाकडून उत्साहात स्वागत

- मराठीच्या मुद्द्यावर एकजूट कायम राखण्याचं राज आणि उद्धव ठाकरे यांचं आवाहन

- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची कर सवलत आणि सरकारी खर्चात कपात करण्याशी संबंधित 'वन बिग ब्युटीफुल लाॅ' विधेयकावर स्वाक्षरी

- सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशनं विजेतेपद पटकावलं

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर करंडक कसोटी क्रिकेटमध्ये दुसऱ्या सामन्यात भारताला २४४ धावांची आघाडी

**<><><><>**

त्रिनिदाद आणि टोबॅगोचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी अर्जेंटिनाची राजधानी ब्युनोस आयर्स इथं पोहोचले. तिथल्या भारतीय समुदायानं त्यांचं मोठ्या उत्साहात स्वागत केलं. प्रधानमंत्र्यांच्या या भेटीमुळे दोन्ही देशांमधली धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल आणि सहकार्याचे नवे मार्ग खुले होतील अशी अपेक्षा आहे.

व्यापार आणि गुंतवणूक, आरोग्य आणि औषधनिर्माण, संरक्षण आणि सुरक्षा, पायाभूत सुविधा, खाणकाम आणि खनिज संपत्ती, कृषी आणि अन्न सुरक्षा, हरित ऊर्जा, आयसीटी आणि डिजिटल नवोन्मेष, आपत्ती व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, शिक्षण आणि परस्परांच्या नागरिकांमधले संबंध या आणि इतर मुद्द्यांवर यावेळी द्विपक्षीय चर्चा होईल.

ग्लोबल साऊथ बरोबर भारताचे संबंध अधिक मजबूत व्हावेत, यासाठी प्रधानमंत्री मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर आहेत. अर्जेंटिनाच्या भेटीनंतर, ते रिओ दि जानेरो इथं

होणाऱ्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझील इथं रवाना होतील. त्यानंतर आपल्या दौऱ्याच्या शेवटच्या टप्प्यात ते नामिबिया इथं भेट देतील.

<><><>

ओदिशामध्ये, पुरी इथं आज भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांची जगप्रसिद्ध 'बहुडा यात्रा' सुरु आहे. आपलं जन्मस्थान असलेल्या गुंडीचा मंदिरात एक आठवडा मुक्काम केल्यावर या देवता आपल्या रथातून १२ व्या शतकातल्या श्री जगन्नाथ मंदिरामध्ये परततील. विविध धार्मिक विधी संपन्न झाल्यावर दुपारी या देवतांची 'पहाडी', म्हणजेच मिरवणूक सुरू झाली. पुरीचे राजा गजपती महाराजा दिव्य सिंह देब दुपारी २.३० ते ३.३० दरम्यान 'छेरा पहानरा' म्हणून ओळखली जाणारी रथांची औपचारिक सफाई करतील आणि त्यानंतर तिन्ही रथांना घोडे जोडले जातील. रथ ओढण्याचा सोहळा दुपारी ४ वाजता सुरु होईल. रथयात्रेच्या पूर्वसंध्येला काल श्री गुंडीचा मंदिरात 'संध्या दर्शन' विधीच्या वेळी हजारो भाविकांनी देवतांचं दर्शन घेतलं. ‘बहुडा यात्रेसाठी स्थानिक प्रशासनानं कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

<><><>

आषाढी एकादशी निमित्त राज्याच्या विविध भागांमधून निघालेल्या साधुसंतांच्या पालख्या आता पंढरपुरात दाखल होत आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी वाखरी इथं मुक्कामी असून संत तुकाराम महाराज, सोपान काका महाराज, संत मुक्ताई, संत गजानन महाराज यांच्या पालख्या पंढरपूर जवळ पोहोचल्या आहेत.

बाजीराव विहीर इथं काल ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचं गोल रिंगण तसंच संत तुकाराम पालखीचा उभा रिंगण सोहळा पार पडला. पंढरपूर इथं भागिकांची होणारी मोठी गर्दी लक्षात घेता, प्रशासनानं चोख बंदोबस्त ठेवला आहे.

<><><>

मराठीच्या मुद्द्यावर राज्यातल्या सर्व नागरिकांनी पक्षीय मतभेद दूर करुन एकत्र यावं असं आवाहन राज आणि उद्धव ठाकरे यांनी आज केलं. मुंबईत वरळीत झालेल्या विजयी मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरे यांच्या भाषणानं या मेळाव्याला सुरुवात झाली. ते म्हणाले

**- होल्ड - राज ठाकरे बाइट -**

या लोकांनी भाषेपासून सुरू केलं असून नंतर आपल्याला जातीपातींमध्ये विभागण्याचा डाव असल्याचा दावा राज ठाकरे यांनी केला. इंग्रजी माध्यमातून मुलांनी शिक्षण घेत असल्याच्या मुद्द्याच्या त्यांनी समाचार घेतला. बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे इंग्रजी माध्यमातून शिकले होते मात्र त्यांच्या मराठीच्या प्रेमावर कुणालाही शंका घ्यायला जागा नव्हती, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. त्यामुळं भाषेचा अभिमान बाळगण्यासाठी कुठल्या भाषेत शिक्षण घेतलं हे महत्त्वाचं नाही, असं ते म्हणाले. त्याचवेळी भाषेच्या मुद्द्यावरुन उगाच मारहाण न करण्याचा सल्ला त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. भाषणाच्या शेवटी त्यांनी मराठी, मराठी भाषा, मराठी माणूस या मुद्द्यावर तडजोड होणार नाही, हे स्पष्ट केलं.

त्यानंतर भाषणाला आलेल्या उद्धव ठाकरे यांनी भाषणापेक्षा एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे, असं म्हणून सुरुवात केली.

**- होल्ड - उद्धव ठाकरे -**

राजकारण्यांनी आतापर्यंत मराठी माणसांना वापरलं आणि फेकून दिलं. संकटात मराठी माणूस एकत्र येतो आणि संकट गेल्यावर एकमेकांशी भांडतो, या पुढे अशा डावांना बळी पडू नका, सर्व पक्षातल्या मराठी माणसांनी एकत्र यावं असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं.

आम्ही कुठल्याही भाषेच्या विरोधात नाही मात्र सक्तीच्या विरोधात आहेत. त्यामुळं कोणावर दादागिरी करणार नाही पण दादागिरी केली तर ती सहन करणार नाही, असा इशारा सुद्धा त्यांनी दिला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात मराठीची सक्ती केली, मराठी भाषा भवनाचं भूमीपूजन केलं, या गोष्टी पुढे खोळंबल्या, असा दावा त्यांनी केला.

सुमारे २० वर्षांनंतर ठाकरे बंधू व्यासपीठावर एकत्र आले असल्यानं राज्यभरातल्या नागरिकांनी या मेळाव्याला गर्दी केली होती.

उद्धव आणि राज ठाकरे दोन्ही बाजूंनी व्यासपीठावर एकत्र दाखल झाले आणि उपस्थितांना अभिवादन केलं तेव्हा उपस्थितांनी जल्लोष केला. या मेळाव्याला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, आमदार जितेंद्र आव्हाड, शेकापचे जयंत पाटील, माकपचे अजित नवले, भाकपचे प्रकाश रेड्डी, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव

जानकर, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, मराठी अभ्यास केंद्राचे दीपक पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

<><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कर सवलत आणि सरकारी खर्चात कपात करण्याशी संबंधित 'वन बिग ब्युटीफुल लॉ' विधेयकावर काल स्वाक्षरी केली. अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिन समारंभाच्या पार्श्वभूमीवर  व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या कार्यक्रमात त्यांनी या विधेयकावर स्वाक्षरी केली. रिपब्लिकन-नियंत्रित प्रतिनिधीगृहानं एक दिवस आधी हे विधेयक मंजूर केलं होतं. अमेरिकेच्या इतिहासात करांमध्ये आणि प्रशासकीय खर्चात केलेली ही सर्वात मोठी कपात आहे, तर सीमा सुरक्षा निधीमधली आतापर्यंतची सर्वात मोठी वाढ असल्याचं ट्रम्प यांनी यावेळी सांगितलं.

<><><>

क्रोएशिया इथं सुरू असलेल्या सुपर युनायटेड रॅपिड अँड ब्लिट्झ बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी. गुकेशनं विजेतेपद पटकावलं आहे. या स्पर्धेत गुकेशनं अंतिम फेरीत अमेरिकेच्या वेस्ली सो चा पराभव केला. १८ पैकी १४ गुण मिळवून गुकेशनं रॅपिड फॉरमॅट मध्ये पहिलं स्थान पटकावलं. पोलंडचा जान क्रिजस्टोफ दुडा दुसऱ्या स्थानावर असून माजी विश्वविजेता नॉवेचा मॅग्नस कार्लसन तिसऱ्या स्थानावर आहे.

<><><>

विंम्बल्डन टेनिस स्पर्धेत आज भारतीय खेळाडूंचे सामने होणार आहेत. पुरुष दुहेरीत आज युकी भांब्री आणि अमेरिकेचा रॉबर्ट गैलोवे यांच्या जोडीचा सामना  पोर्तुगालच्या  नूनो बोर्गेस आणि अमेरिकेच्या मार्कोस गिरोन या जोडीशी होणार आहे. तर भारताच्या एन. श्रीराम बालाजी आणि मेक्सिकोच्या मिगुएल एंजल रेयेस-वरेला या जोडीचा सामना अर्जेंटिनाच्या होरासिओ झेबालोस आणि स्पेनच्या मार्सेल ग्रॅनोलर्सशी होईल. भारताचा रित्विक चौधरी बोलिपल्ली आणि कोलंबियाचा निकोलस बॅरिएंटोस ही जोडी ब्रिटनच्या जो सॅलिसबरी आणि नील स्कुप्सकी यांच्याशी लढेल.

<><><>

बर्मिंगहम इथं सुरू असलेल्या अँडरसन तेंडुलकर करंडक स्पर्धेत दुसऱ्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या चौथ्या दिवशी आज भारत आपला दुसरा डाव खेळणार आहे.

इंग्लंडनं पहिल्या डावात ४०७ धावा केल्या. यात मोहम्मद सिराजनं सहा आणि आकाश दीपने चार बळी घेतले. इंग्लंडच्या जेमी स्मिथने नाबाद १८४ धावा तर हॅरी ब्रूकने १५८ केल्या.

तिसऱ्या दिवसअखेर काल भारतानं दुसऱ्या डावात इंग्लंडविरुद्ध २४४ धावांची आघाडी घेतली आहे.

<><><><>

भारतातून अमेरिका आणि इतर देशांमध्ये होणाऱ्या मानवी तस्करीमध्ये सहभाग असल्याच्या आरोपाखाली एनआयए, अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेनं काल हिमाचलप्रदेश आणि दिल्ली मधून दोन जणांना अटक केली. त्यांच्या विरोधात डॉकी रूट नं मानवी तस्करीमध्ये सहभाग, आणि लॅटिन अमेरिकेत मानवी तस्करांना निधी हस्तांतरित करण्याचा आरोप आहे. मानवी तस्करी प्रकरणातला मुख्य आरोपी गंगदीप सिंग याला यंदाच्या मार्चमध्ये अटक करण्यात आली होती. हे दोन्ही आरोपी त्याचे सहकारी असल्याचं एनआयए नं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

अमेरिकेत, टेक्सासमध्ये आलेल्या महापुरात २४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण बेपत्ता आहेत. टेक्सासचे गव्हर्नर ग्रेग अॅबॉट यांनी मध्य टेक्सासच्या अनेक काउंटीज मध्ये आपत्कालीन परिस्थिती घोषित केली असून, शोध आणि बचाव कार्य युद्ध पातळीवर सुरु राहील असं म्हटलं आहे.

//<><><><>//